**ठळक बातम्या**

- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्राला सुरुवात, लोकसभेत चालू आर्थिक वर्षासाठी ५१ हजार ४६२ कोटी ८६ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या केंद्रीय अर्थमंत्र्यांनी केल्या सादर
- मॉरिशस हा भारताचा हिंद महासागर क्षेत्रातला महत्त्वाचा शेजारी देश असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- उद्योग, पायाभूत सुविधा, कृषि आणि सामाजिक क्षेत्रासह सर्वच क्षेत्राच्या विकासासाठी महत्वाच्या तरतुदींचा अर्थसंकल्प अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडून सादर
- व्यक्तीगत वापराच्या सीएनजी आणि एलपीजी वाहने, ३० लाखापेक्षा अधिक किंमतीच्या इलेक्ट्रिक वाहने तसंच बांधकाम आणि मालवाहतूकीच्या वाहनांवर वाढीव कर आकारण्याचा अजित पवार यांचा प्रस्ताव
- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना लवकरच एकवीसशे रुपये देण्याचं नियोजन सुरू असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं स्पष्टीकरण

**आणि**

- जनता, शेतकरी आणि लाडक्या बहिणींची फसवणूक करणारा अर्थसंकल्प असल्याची विरोधकांची टीका

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं दुसरं सत्र आजपासून सुरु झालं. लोकसभेत आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी चालू आर्थिक वर्षासाठी विविध विभागांच्या खर्चासाठी ५१ हजार ४६२ कोटी ८६ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. या रकमेतले  निवृत्तीवेतनासाठी

१३ हजार ४४९ कोटी रुपये आणि खतांवरच्या अनुदानासाठी १२ हजार कोटी रुपये दिले जाणार आहेत. केंद्रीय अर्थमंत्र्यांनी लोकसभेत २०२५-२६ यावर्षासाठी मणिपूरशी संबंधित अर्थसंकल्पही सादर केला.

त्याआधी आज कामकाजाला सुरुवात झाल्यावर पीएम श्री योजनेच्या अंमलबजावणीबाबत तमिळनाडू सरकारवर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी केलेल्या टिप्पणीच्या निषेधात द्रमुक सदस्यांनी गदारोळ केला. त्यामुळे सभागृहाचं कामकाज अर्धा तास तहकूब करण्यात आलं. मतदार याद्यांमधे घोटाळे झाल्याचा आरोप करत त्याविषयी चर्चेची मागणी आज विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी केली.

**<><><><><>**

मॉरिशस हा भारताचा हिंद महासागर क्षेत्रातला महत्त्वाचा शेजारी देश असून आफ्रिकी खंडांचं प्रवेशद्वार आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी उद्यापासून सुरू होणाऱ्या मॉरिशस दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर आज केलं. भारत आणि मॉरिशस हे दोन्ही देश इतिहास, भूगोल आणि संस्कृतीने जोडलेले असून परस्परांवरचा दृढ विश्वास, लोकशाही मूल्यांवरची सामायिक श्रद्धा आणि विविधतेला दिलेलं महत्त्व ही या दोन्ही देशांची बलस्थानं आहेत, असं प्रधानमंत्र्यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

नव्या काळाच्या गरजेनुसार शिक्षण व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल घडवण्यासाठी नवं राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी केली जात असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. त्या आज हरियाणातल्या हिसारमधल्या गुरु जंभेश्वर विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्यापीठाच्या पदवीदान

समारंभात बोलत होत्या. नव्या शैक्षणिक धोरणानुसार मिळणारं शिक्षण मुलांमध्ये कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन मिळेल, असंही त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

उद्योग, पायाभूत सुविधा, कृषि आणि संलग्न क्षेत्रे, सामाजिक तसंच इतर क्षेत्राच्या विकासासाठी महत्वाच्या तरतुदी करणारा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सादर केला. त्यांचा हा ११ वा अर्थसंकल्प होता. राज्य सरकार लवकरच नवे औद्योगिक, कामगार, गृहनिर्माण, जलप्रवास, आरोग्य आणि ज्येष्ठ नागरिक धोरण जाहीर करणार असल्याची घोषणा यावेळी केली.

नव्या औद्योगिक धोरणातून ५ वर्षात ४० लाख कोटींची गुंतवणूक, ५० लाख रोजगारनिर्मितीचं उद्दिष्ट सरकारनं ठेवले आहे.

नवी मुंबईत महामुंबई आंतरराष्ट्रीय बाजार, मुंबईत मरोळमध्ये आंतरराष्ट्रीय मत्स्य बाजार, गडचिरोलीतल्या आरमोरीत रेशीम कोष खरेदी विक्री बाजार उभारली जाणार आहे.

एसटी महामंडळाला नवीन बस खरेदीसाठी सरकार अर्थसहाय्य देणार आहे.

**<><><><><>**

बी बियाणे, यंत्रसामुग्री, खते आणि शेतमालाच्या वाहतुकीसाठी बळीराजा शेत आणि पाणंद रस्ते ही नवे योजना अर्थमंत्र्यांनी आज जाहीर केली. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या दुसऱ्या टप्प्यासाठीच्या अनुदानात ५० हजार रुपयांची वाढ अर्थमंत्र्यांनी आज जाहीर केली.

येत्या आर्थिक वर्षात लाडकी बहीण योजनेसाठी ३६हजार कोटींचा निधी राखून ठेवला असल्याचं अर्थमंत्री म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराजांचे आग्र्यात, छत्रपती संभाजी महाराजांचे संगमेश्वरमध्ये आणि मराठ्यांचे शौर्याचे प्रतीक म्हणून पानिपतमध्ये, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे साताऱ्यातल्या नायगावमध्ये, माजी प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांचे मुंबईत स्मारक उभारण्याची घोषणा अजित पवार यांनी आज केली. रिद्धपूरमधल्या मराठी भाषा विद्यापीठात अभिजात मराठी भाषेच्या संशोधन आणि अध्ययनासाठी उच्च दर्जाचे संशोधन केंद्र आणि अनुवाद अकादमी स्थापन केली जाणार आहे.

**<><><><><>**

आगामी आर्थिक वर्षाचा एकूण ७ लाख २० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प अर्थमंत्री अजित पवार यांनी आज सादर केला. त्यात ५ लाख ६० हजार ९६४ कोटी रुपयांची महसुली जमा आणि ६ लाख ६ हजार ८५५ कोटी रुपयांचा महसुली खर्च अपेक्षित आहे. यात ४५ हजार ८९१ कोटी रुपये तूट अपेक्षित आहे.

**<><><><><>**

व्यक्तीगत वापराच्या सीएनजी आणि एलपीजी वाहनांवरच्या करात १ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव अर्थमंत्री अजित पवार यांनी आज सादर केला. याशिवाय ३० लाखापेक्षा अधिक किंमतीच्या इलेक्ट्रिक वाहनांवर ६ टक्के दराने मोटार वाहन कराची आकारणी आणि बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या क्रेन्स, कॉम्प्रेसर, प्रोजेक्टर्स आणि एस्कॅव्हेटर्स या प्रकारातील वाहनांना तसंच मालवाहतूक करणाऱ्या हलक्या वाहनांवर ७ टक्के दराने

मोटार वाहन कर आकारण्याचा प्रस्ताव त्यांनी मांडला. विविध गोष्टींसाठी लागणारं मुद्रांक शुल्क शंभर रुपयांवरुन ५०० आणि १ हजार रुपये करण्याचा प्रस्तावही त्यांनी सादर केला आहे.

**<><><><><>**

आगामी वर्षाचा अर्थसंकल्प हा लोकाभिमुख आणि राज्याला विकसित महाराष्ट्राच्या उद्दिष्टाकडे घेऊन जाणारा असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना एकवीसशे रुपये देण्याचं आश्वासन पूर्ण करण्यासाठी नियोजन सुरू आहे, असं त्यांनी आज अर्थसंकल्पानंतर वार्ताहर परिषदेत जाहीर केलं. या अर्थसंकल्पात कुठल्याही प्रकारे योजनांना कात्री लावलेली नाही. उलट पायाभूत सुविधांच्या विकासांना वेग दिल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

राज्याच्या तिजोरीत अधिकाधिक निधी येण्यासाठी केलेल्या तरतुदींची माहिती अर्थमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

महायुती सरकारने निवडणूक काळात दिलेल्या एकाही आश्वासनाची पूर्तता अर्थसंकल्पात केली नाही. या अर्थसंकल्पाद्वारे सरकारने जनतेची फसवणूक केल्याची टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. शेतकरी आणि लाडक्या बहिणींची फसवणूक करणारा हा अर्थसंकल्प असल्याचं विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले.

या अर्थसंकल्पात एसटी, रेल्वेने प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य, गरीब, मध्यमवर्गीयांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले गेले असल्याची टीका माजी अर्थमंत्री जयंत पाटील यांनी केली. शेतकरी कर्जमाफी, प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा निधी आणखी ३ हजार रुपयांनी वाढवण्याची घोषणा अर्थसंकल्पात नसल्याचं त्यांनी सांगितलं.

राज्यात आर्थिक बेशिस्तीचा कारभार सुरू असून आठ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज झाले आहे. महाराष्ट्र आता थांबणार नाही म्हणणारं हे सरकार राज्याला कर्जबाजारी करून देशोधडीला लावणार, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी केली.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज २१७ अंकांची घसरण झाली आणि तो ७४ हजार ११५ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ९२ अंकांची घसरण नोंदवत २२ हजार ४६० अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

रशियाने आज दोन ब्रिटीश राजदुतांवर हेरगिरीचा आरोप करत दोन आठवड्यांच्या आत देश सोडण्याचे आदेश दिले. रशियाच्या फेडरल सिक्युरिटी सर्विसने राजदूतांवर वैयक्तिक माहिती पुरवल्याचा आणि राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या कारवायांमध्ये सहभागी असल्याचा आरोप केला आहे. मात्र, या संदर्भातला कोणतीही पुरावा सादर केलेला नाही.

**//<><><><><>//**